PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES Vol 1, Issue 1

# प्राथमिक स्तरावरील इतिहास अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्दिष्ट

**प्रा. नितीन तुकाराम जाधव**
एम. ए. एम. एड., एम. फिल., सेट
सहा. प्राध्यापक, के. एच. कॉलेज, गारगोटी
जि. कोल्हापूर, महाराष्ट्र.

## १ प्रस्तावना

संशोधकाने प्रथम संशोधन तज्ञ आणि इतिहास तज्ज्ञांच्या सहाय्याने इयत्ता चौथीचे पूर्ण अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक यांचे विश्लेषण करण्याचे निश्चित केले आणि अशा प्रकारे सखोल विश्लेषण केल्यानंतर त्या समितीच्या अनुषंगाने इतिहास विषयाच्या उद्दिष्टांना सफल करण्यास मदत करेल असा बहुमाध्यम संच निर्माण करण्याचा निश्चय केला. यामध्ये इतिहास विषयाचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक स्तरावर सखोल विश्लेषण करण्यात आले

## २ इतिहास अभ्यासक्रम

सामान्यत: अभ्यासक्रम म्हटले की, आपल्या समोर काही ठराविक विषय, त्यातील ठरावीक निवडक विषयांश व त्यांची क्रमवार मांडणी असे चित्र उभे राहते. परंतु आधुनिक शिक्षण शास्त्रज्ञांच्या मते, अभ्यासक्रम या शब्दाचा खरा अर्थ खालील व्याख्यांवरून लक्षात येईल.

मन्रोच्या मते –

‘‘शैक्षणिक ध्येय साध्य करून घेण्यासाठी शाळेत उपयोगात आणलेल्या सर्व प्रकारच्या अनुभवांचा अभ्यासक्रमात समावेश होतो.’’

कॅसवेलच्या मते –

‘‘अभ्यासक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनात व विद्यार्थ्यांशी संबंधित असे शिक्षकांच्या व पालकांच्या जीवनात जे जे काही घडते ते शालेय वेळात विद्यार्थ्यांना व्यापून टाकणारा परिसर म्हणजे अभ्यासक्रम.’’

थोडक्यात अभ्यासक्रम म्हणजे शालेय जीवनातून मिळणारे सर्व प्रकारे संस्कारक्षम अनुभव होय. अभ्यासक्रम या शब्दावरून एक लक्षात येते की, अभ्यासक्रम हा उद्दिष्टे प्राप्तीचे एक साधन आहे.

अभ्यासक्रमाची रचना व संघटन करणे हे कार्य कठीण व जबाबदारीचे असते. म्हणून निरनिराळ्या शिक्षण तज्ज्ञांनी व अभ्यासक्रम रचनाकारांनी अभ्यासक्रम रचनेबद्दल सखोल व सर्वांगीण व शास्त्रीय पद्धतीने विचार करून काही पद्धती सूचविलेल्या आहेत. तेव्हा शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी त्यांचा परिचय करून घेणे उपयुक्त ठरते.

अभ्यासक्रम रचनेच्या विविध पद्धती आहेत त्या खालीलप्रमाणे -

१. कालाक्रम पद्धती (Chronological Method)

२. समकेंद्र पद्धती (Concentric Method)

३. परावर्तन पद्धती (Regressive Approach)

४. चरित्र पद्धती (Biographical Approach)

५. विशिष्ट विषय पद्धती (Topical Method)

६. पॅच पद्धती (Patch History)

७. आधार व मुळ स्त्रोत (Source Method)

८. कालखंड पद्धती (Periodic Method)

## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ आणि अभ्यासक्रम २००४

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार अभ्यासक्रम १९८८ मध्ये इयत्ता १ ली ते २ री साठी 'परीसर अभ्यास' हा विषय समाविष्ट केला आहे. 'सामाजिक शास्त्रे' म्हणून इ. ३ री पासून इतिहास-नागरिकशास्त्र, भूगोल या विषयांचा समावेश झाला आहे.

अभ्यासक्रमाची रचना गमितमान व काळाबरोबर चालणारी असावी लागते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात (NCF २००५) अभ्यासक्रमाविषयी काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ अपेक्षा :

१. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासक्रमातून मुलांना आपल्या समाजाचे चिकित्सक भान येऊ शकेल अशा सामग्रीची निवड व संघटन व्हावे.

२. मुलांची नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाविषयीची जाण समृद्ध होईल अशा उपक्रमांत त्यांना गुंतविले जावे. यातून जाणून घेण्याची प्रक्रिया निरीक्षणावर आणि उदाहरणांवर आधारित असावी. ही उदाहरणे सांस्कृतिक-सामाजिक व भौतिक-जैविक घटकांवर आधारित असावीत.

३. मुलांना या विषयाच्या माध्यमातून नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणातील आंतरसंबंध ओळखण्यास व समजण्यास शिकवले जावे.

४. नागरिकशास्त्राचा मुख्य भर समता, बंधुता, न्याय, बहुविधता, शोषणापासून मुक्ती या भारतीय संविधानाच्या मूलभूत संकल्पनांची सखोल चर्चा करण्यावर असावा.

ऐतिहासिक व समकालीन आस्थाविषयक चर्चामध्ये स्त्रियांचे दृष्टिकोन केंद्रवर्ती बनविण्याच्या दृष्टीने लिंगभावात्मक मुद्यांचा विचार अभ्यासक्रमातून व्हावा.

NCF २००५ मध्ये व्यक्त केलेल्या या अपेक्षांनुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे. वर्गातील उपक्रम व अनुभवांआधारे या अपेक्षांना मूर्तरूप प्राप्त व्हावे अशी अपेक्षा आहे.

## ३ पाठ्यक्रमाची ओळख

इतिहास – नागरिकशास्त्र या विषयाचा पाठ्यक्रम हा पाठ्यांश, अध्ययन निष्पत्ती, प्रमुख जाणिवा या स्तंभात मांडला आहे. यात इतिहासातील मध्ययुगीन समाजजीवन व नागरिकशास्त्रातील आपले सामूहिक जीवन, सामाजिक संस्था, नागरी सुविधा देणाऱ्या संस्था, सुरक्षितता या घटकांचा नव्याने समावेश केला आहे.

इयत्ता तिसरीच्या पाठ्यक्रमातून प्राचीन काळातील धातुयुगापर्यंतचा सामाजिक व प्रयत्नवादी इतिहास मांडला आहे. चौथीच्या पाठ्यक्रमात प्राचीन काळाशी सांधेजोड मध्ययुगाशी करून देताना राजेशाही व लोककल्याणकारी राजे यांचा परिचय करून देणारे नवीन घटक पाठ्यक्रमात समाविष्ट केले आहेत. पाठ्यक्रमात छत्रपती शिवाजीमहाराजांच्या मूल्याधिष्ठित व प्रेरणादायी जीवनकथेवर भर दिलेला आहे.

नागरिकशास्त्रातील पाठ्यक्रम हा या इयत्तेसाठी पूर्णपणे नवीन स्वरूपाचा आहे. इयत्ता तिसरीतील माझे गावं, कुटुंब, शेजार व परिसर घटकांची व्याप्ती वाढवून देणारा हा पाठ्यक्रम आहे.

अभ्यासक्रम आराखड्यानुसार (NCF २००५) नैसर्गिक व पर्यावरणातील आंतरसंबंधाची ओळख या घटकांतून समाजाचे चिकित्सक भान निर्माण होईल यांच्या उपयुक्ततेची जाणीव झाल्याने सामाजिक ऐक्यभावना दृढ होणार आहे.

इयत्ता चौथीसाठी नियोजित पाठ्यक्रम व त्यातील सहसंबंध पाठ्यक्रमाच्या खालील ओघतक्त्यातून स्पष्ट होईल.

### विद्यार्थ्यांनी संपादित करावयाची कौशल्ये

I) प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंत झालेली समाजाच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे.

१. मध्ययुगीन भारतात राजेशाही हा शासनप्रकार होता हे विद्यार्थी जाणतो.

२. मध्ययुगीन लोककल्याणकारी राज्यकर्ते व त्यांचे कार्य विद्यार्थी जाणतो.

३. शिवरायांचे बालपण, शिक्षण व स्वराज्य स्थापनेविषयी विद्यार्थी माहिती घेतो.

४. विविध अडचणीवर मात करून शिवरायांनी स्वराज्याची वाटचाल कशी केली हे विद्यार्थी समजावून घेतो.

५. शिवरायांच्या राज्यव्यवस्थेची माहिती विद्यार्थी मिळवितो.

६. शिवरायांच्या कार्याचे समाजावरील दीर्घ परिणाम विद्यार्थी जाणतो.

II) धर्मसहिष्णुता, सामाजिक सुसंवाद व समता या जाणिवा विकसित करणे.

१. संतांच्या शिकवणुकीचे महत्त्व विद्यार्थी जाणून घेतो.

२. शिवरायांचे धर्मसहिष्णु धोरण विद्यार्थी जाणून घेतो.

३. तत्कालीन समाजजीवनाची ओळख विद्यार्थी करून घेतो.

४. आपल्या गरजा परस्पर सहकार्यातून कशा भागवल्या जातात हे विद्यार्थी जाणतो.

५. सांस्कृतिक उपक्रमांची ओळख विद्यार्थी करून घेतो.

III) समाजहितासाठी असणाऱ्या नियमांचा आदर करून त्यांचे पालन करण्याची वृत्ती वाढीस लागणे.

१. ग्राहक संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थी जाणतो.

२. रहदारीचे नियम पालनाचे महत्त्व विद्यार्थी जाणतो.

३. अपघात ग्रस्तांना मदत करावी हे विद्यार्थी जाणतो.

IV) कुटुंबाचा व समाजाचा एक घटक या नात्याने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची जाणीव निर्माण करणे.

१. संस्थात्मक जीवनाचा स्थूल परिचय विद्यार्थ्यास होतो.

२. घरातील व घराबाहेरील सुरक्षिततेचे महत्त्व विद्यार्थी जाणतो.

३. अनोळखी वस्तू हाताळताना सावधानता बाळगावी हे विद्यार्थी जाणतो.

V) कुटुंब व परिसरातील व्यक्तींशी सहकार्य करण्याची वृत्ती जोपासणे

१. व्यापक समाजजीवनाची ओळख विद्यार्थी करून घेतो.

२. सामूहिकता, सहकार्य आणि परस्परावलंबन ही मूल्ये जीवनात महत्त्वाची असतात हे विद्यार्थी जाणतो.

VI) सामाजिक मालमत्तेच्या जतनाची आवश्यकता पटवून देऊन तिचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे

१. सार्वजनिक मालमत्तेचे जतन व रक्षण करण्याचे महत्त्व विद्यार्थी जाणतो.

VII) ऐतिहासिक वस्तूंच्या, वास्तूंच्या जतनाची आवश्यकता पटवून देऊन त्यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

**जीवन-कौशल्ये शिक्षण (Life-Skills Education)**

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे 'जीवन-कौशल्ये शिक्षण' होय. हे साध्य होण्यासाठी जीवनाच्या प्राथमिक टप्प्यांत विद्यार्थ्यांना संधी पुरविणे नितांत गरजेचे आहे. या खेरीज या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भौतिक व मानसिक क्षमतांच्या जास्तीत जास्त उपयोगातून त्यांच्या व्यक्तिमत्वांचा विकास घडवणे हेही एक उद्दिष्ट आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) यासाठी पुढीलप्रमाणे दहा जीवन-कौशल्ये पुरस्कृत केली आहेत.

१) स्व-जागृती (Self awareness)

स्वत:च्या क्षमता, मर्यादा, आवडी-निवडी, आकांक्षा ओळखण्याचे कौशल्य.

२) सहानुभूती (Empathy)

दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून विचार करण्याचे कौशल्य.

३) समस्या निराकरण (Problem Solving)

उपलब्ध पर्यायातून योग्य व संभाव्य पर्याय निवडून कार्यवाही करण्याचे कौशल्य.

४) निर्णय घेणे (Decision Making)

समस्या सोडविण्याच्या प्रक्रियेत अनेक पर्याय शोधून त्यातील योग्य पर्याय स्वीकारण्याचे कौशल्य.

५) प्रभावी संप्रेषण (Effective Communication)

आपले विचार शाब्दिक किंवा अशाब्दिक माध्यमांतून प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कौशल्य.

६) चिकित्सक विचारप्रक्रिया (Critical Thinking)

उपलब्ध माहितीचे विश्लेषण व परीक्षण वस्तुनिष्ठपणे करण्याचे कौशल्य.

७) सर्जनशील विचारप्रक्रिया (Ureative Thinking)

पारंपारिक व पुनरावृत्तीने आढळणाऱ्या पद्धतीपेक्षा वेगळ्या व अभिनव पद्धतीने एखाद्या समस्येबद्दल किंवा परिस्थितीबद्दल विचार करण्याचे कौशल्य.

८) आंतरव्यक्ती संबंध (Interpersonal Relations)

दैनंदिन जीवनात सतत संपर्कात असलेल्याबरोबरचे संबंध ओळखून निर्भळ व स्नेहपूर्ण संबंध राखण्याचे कौशल्य.

९) भावनांचे समायोजन (Coping With Emotions)

आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम ओळखून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य.

१०) ताणतणावांचे समायोजन (Coping with stress)

ताणतणावांची कारणे, शोधून त्यांचे होणारे शारिरीक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य.

वर नमूद केलेली जीवन कौशल्ये वर्गाध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे. इतिहास व नागरिकशास्त्र अध्यापनाची उद्दिष्टे व ही जीवन-कौशल्ये यांची योग्य सांगड घातल्यास वरीलपैकी बऱ्याच जीवन-कौशल्यांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये करणे शक्य होईल.

## ४. अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्दिष्टे

१. प्राचीन काळापासूनची वर्तमानकाळापर्यंतची समाजाच्या विकासाची प्रक्रिया समजावून सांगणे.

२. मानवाची उत्क्रांती, संस्कृतीचा विकास व समाज कल्याणासाठी भूतकाळात व वर्तमानकाळात विविध व्यक्तींनी दिलेल्या योगदानाची कदर करण्याची वृत्ती जोपासणे.

३. जगातील विविध सांस्कृतिक प्रवाहांनी मानवी जीवन संपन्न केले आहे, याची जाणीव निर्माण करणे.

४. जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी व निर्मितीक्षमता जोपासणे.

५. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

६. 'समृद्ध वारशाचे जतन, पण हीन असेल त्याचा त्याग' ही दृष्टी विकसित करणे.

७. अनिष्ठ रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांचा त्याग करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

८. मानव, समाज आणि पर्यावरण यांच्या परस्परावलंबित्वाची प्रक्रिया समजावून घेण्यास समर्थ करणे.

९. ऐतिहासिक अवशेष, साधने, स्मारके आणि वास्तू यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

१०. भारतीय समाजाच्या विकासातील टप्प्यांविषयी माहिती करून घेण्यास मदत करणे.

११. भारतीय संस्कृतीच्या विविधतेची आणि विविधतेतील एकतेची जाण निर्माण करणे.

१२. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात व समाजसुधारणा चळवळीत समाजातील सर्व थरांतील स्त्री-पुरूषांनी केलेल्या योगदानाविषयी जाणीव विकसित करणे.

१३. भारतीय संविधानात नमूद केलेली लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.

१४. भारताची एकता व अखंडता याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आदराची भावना निर्माण करणे.

१५. राष्ट्रीय प्रतिकांबद्दल आदर आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे.

१६. समाजातील दुर्बल घटक व महिला यांच्या सबलीकरणाची जाणीव निर्माण करणे.

१७. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्यांची जाणीव निर्माण करणे.

१८. जबाबदार व क्रियाशील नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे.

१९. संयम, सहिष्णुता, समता आणि सामुहिकता कर्तव्यभावना या मूल्यांची जोपासना करणे.

२०. भारतातील लोकप्रशासनाचे स्थूल स्वरूप समजण्यास मदत करणे.

२१. सार्वजनिक मालमत्तेच्या रक्षणाविषयी जाणीव निर्माण करणे.

२२. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना उचित प्रतिसाद देण्यास सक्षम बनविणे.

२३. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे.

२४. आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्य यांची जाणीव निर्माण करणे.

### ४.१ अभ्यासक्रमाचे गाभाभूत घटक

गाभाघटक – अभ्यासक्रम – पाठ्यक्रम यांचा संबंध

प्रचलित अभ्यासक्रमाची विभागणी चार स्तरांत केलेली आहे, हा अभ्यासक्रम दहा गाभा घटकांवर आधरित आहे. हे गाभाघटक सर्व अभ्यासक्रमासाठी पायाभूत आहेत. परंतू आपण या गाभाघटकांचे अवलोकन केल्यास असे आढळून येईल की, या गाभाघटकांचा इतिहास विषयांशी अतिशय निकटचा संबंध आहे. हे गाभाघटक पुढीलप्रमाणे –

१. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास

२. संविधानात्मक जबाबदाऱ्या

३. राष्ट्रीय व्यक्तिमत्वाची जोपासना

४. भारताचा समान सांस्कृतीक वारसा

५. समानता, धर्मनिरपेक्षता व लोकशाही

६. स्त्री–पुरूष समानता

७. पर्यावरणाचे रक्षण

८. सामाजिक अडसरांचे निर्मूलन

९. मर्यादीत कुटंबाची आवश्यकता

१०. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा परिपोष

उपरोक्त गाभा घटक हे अभ्यासक्रम रचनेचा पाया आहे. या गाभाघटकांच्या आधारेच अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. शालेय अभ्यासक्रम चार टप्प्यांत विभागलेला आहे. सर्वच गाभाघटकांचा इतिहासाच्या अभ्यासक्रमाशी अगदी प्रत्यक्ष संबंध आहे असे नाही.

**अभ्यासक्रम**

**प्राथमिक स्तर (इयत्ता ३ री ते ५ वी)**

प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात इयत्ता ३ री पासून इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय सुरू केलेले आहेत. तरीही प्राथमिक स्तरावर सामाजिक शास्त्रे (इतिहास, भूगोल, ना. शास्त्र) परिसराच्या माध्यमातून शिकवावीत, अशी अपेक्षा आहे. अभ्यासक्रम पुस्तिकेत प्राथमिक स्तरावरील इतिहास व ना. शास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमात मानवाची उत्क्रांती व सांस्कृतिक विकास, इतिहासाला आकार देणाऱ्या थोर व्यक्ती, ऐतिहासिक घडामोडी यांचा समावेश आहे. या स्तरावर विद्यार्थ्यांना भूतकाळाची ओळख व्हावी, मानव आजच्या प्रगत व्यवस्थेला कसा पोहोचला, मानवी प्राण्याची प्रगती टप्प्याटप्प्याने कशी होत गेली, कालगणना कशी करतात, मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या घटना, मानवी जीवन समृद्ध करण्यात तसेच सामाजिक व राजकीय जीवनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या व्यक्ती या

सर्वांची स्थूल ओळख व्हावी हा उद्देश आहे. या आधारे इ. ३ री, इ. ४ थी व इ. ५ वी चा वर्गवार अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

**पाठ्यक्रम**

**इयत्ता ३ री**

अश्मयुगातील मानव, अग्नीचा शोध, शेतीस्थिर जीवन, धातूचा वापर, नागरी जीवन, चक्राचा शोध, दळणवळणाची साधने.

**इयत्ता ४ थी**

आपले जीवन समृद्ध व सुंदर करणाऱ्या गोष्टी (१) भारतातील लोक, भारत एक राष्ट्र, (२) भारतातील संस्कृतीची जडण-घडण, तिच्या समृद्धीचे व विविधतेचे निरनिराळे पैलू, (३) महाराष्ट्रातील संत - संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, (४) गोष्टीरूप शिवकाल - बालपण, स्वराज्याची स्थापना, राज्यव्यवस्था, राज्यभिषेक.

**इयत्ता ५ वी**

घटक (१) बदलते जग - गौतम बुद्ध, सॉक्रेटिस, स्पार्टाकस, अब्राहम लिंकन, कार्ल मार्क्स, सन्‌यत्‌सेन, स्वामी विवेकानंद, मार्टिन ल्यूथर किंग घटक (२) आपला स्वातंत्र्य लढा - भारतात ब्रिटीश सत्तेची स्थापना व ते स्वातंत्र्यप्राप्ती.

**प्राथमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाची सर्वसामान्य उद्दिष्टे**

१. विद्यार्थ्याला सामाजिक व भौतिक परिसराबद्दलचे ज्ञान मिळविण्यास व जाणिवा विकसित करण्यास समर्थ करणे.
२. प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंत समाजाच्या विकासाची झालेली प्रक्रिया समजावून घेणे.
३. मानवां-मानवातील व मानव आणि पर्यावरण यांच्या परस्परावलंबित्वाची प्रक्रिया समजावून घेण्यास समर्थ करणे.
४. विद्यार्थ्यांमध्ये सूक्ष्मावलोकन करण्याची, जिज्ञासू वृत्ती वाढविण्यासाठी माहिती गोळा करण्याची, वादविवाद करण्याची कौशल्ये अंगी बाणवून घेऊन त्यानुसार स्वत:चा दृष्टिकोन स्पष्ट करण्याची क्षमता निर्माण करणे.
५. विशुद्ध देशभक्ती आणि आंतरराष्ट्रीय सांमजस्यांची भावना विकसित करण्यास विद्यार्थ्यांना समर्थ करणे.
६. लिंगभेद, श्रद्धास्थाने व भाषा यांचा विचार न करता विद्यार्थ्याला मानवी समानतेची मूल्ये समजावून देण्यास मदत करणे.
७. सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात, प्रतिकूल व पुराणमतवादी वृत्तीपासून अलिप्त राहून भारताच्या सांस्कृतिक वारशाची जाण करून घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

८. लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता इत्यादी घटनेत असलेल्या मूल्यांविषयी विश्वास निर्माण करणे.

९. भारताची एकता व अखंडता याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आदराची भावना निर्माण करणे.

**उच्च प्राथमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाची सर्वसामान्य उद्दिष्टे**

१. भारतीय समाजाच्या विकासातील प्रमुख टप्प्यांविषयी माहिती करून घेण्यास मदत करणे.

२. भारतीय संस्कृतीच्या विविध घटकांचा देशातील विविध भागांमध्ये झालेला विकास जाणून घेण्याबद्दल अभिरूची निर्माण करणे.

३. विद्यार्थ्याने व्यक्तिगत, तर्कविसंगत पूर्वग्रह, कर्मठपणा, प्रादेशिकता आणि जातीयता यांच्यापासून मुक्त व्हावे, विद्यार्थ्यामध्ये शास्त्रीय व प्रागतिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व त्यातून भूतकाळाकडे पाहण्याची चिकित्सक व शास्त्रीय दृष्टी निर्माण व्हावी.

४. भारतीय संस्कृतीचा विविधतापूर्ण सांस्कृतिक वारसा, समृद्धी आणि तिच्या विकासाची प्रक्रिया समजून घेण्याविषयी अभिरूची निर्माण करणे.

५. ऐतिहासिक संदर्भात भारतीय समाजाच्या समकालीन समस्यांचा अभ्यास करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

६. न्याय समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी परिवर्तनाची क्रिया आवश्यक आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

७. भारतीय इतिहासाचा अभ्यास मानवाच्या ऐतिहासिक विकासाच्या संदर्भात करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

८. भारतीय स्वातंत्र्य लढा याची ध्येये, मूल्ये यांचे ज्ञान करून घेण्यास मदत करणे.

९. ऐतिहासिक अवशेषांच्या जतनाची आवश्यकता पटवून घेऊन त्यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

**माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाची सर्वसामान्य उद्दिष्टे**

१. मानवी समाजाच्या परिवर्तनाची व विकासाची प्रक्रिया समजून घेणे.

२. मानवी संस्कृतीचा पाया समजून घेणे व मानवजातीतील मूलभूत ऐक्य समजून घेणे.

३. मानवजातीचा समृद्ध वारसा निर्माण करण्यात विविध संस्कृतीनी दिलेल्या योगदानाची जाण निर्माण करणे.

४. विविध संस्कृतीच्या परस्पर आंतरक्रिया हा मानवी विकासाचा प्रमुख घटक आहे, हे समजून घेणे.

५. समकालीन जग, समजून घेणे, तसेच विश्वबंधुत्व व आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी व्यापक दृष्टिकोन निर्माण करणे.

६. समकालीन भारत समजून घेण्यासाठी भारतीय इतिहासाच्या घडामोडींच्या महत्त्वाच्या पैलूची जाण समृद्ध करणे.
७. उच्च स्तरावर जागतिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर काही विशिष्ट देशांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यास मदत करणे.
८. वर्तमानाची अधिक चांगली समज येण्यासाठी भूतकाळाचा अर्थ लावणे.
९. इतिहासाच्या अभ्यासाकडे बघण्याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन तयार करणे.
१०. निरोगी राष्ट्रीयत्व, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव आणि लोकशाही समाजवादी वृत्ती निर्माण करणे.

**उच्च माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाची सर्वसामान्य उद्दिष्टे**

१. विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी जो प्रदेश व कालखंड निवडला आहे त्याबद्दल विश्वसनीय ऐतिहासिक ज्ञान पुरविणे.
२. इतिहासाच्या अभ्यासासाठी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन निर्माण करणे.
३. ऐतिहासिक संशोधनाच्या पद्धतींची ओळख करून देणे.
४. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व, अवास्तव पूर्वग्रह, जातीयवाद यापासून मुक्त असावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती, चिकित्सक अभ्यास, वैज्ञानिक आणि भविष्याचा वेध घेण्याचा दृष्टिकोन निर्माण व्हावा म्हणून मदत करणे.
५. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर समकालीन समस्यांचा अभ्यास करण्याचे महत्त्व समजून घेण्याची वृत्ती विकसित करणे.
६. मानवी प्रगती साधण्यात विविध संस्कृतीचे योगदान समजून घेण्याची क्षमता निर्माण करणे.
७. धार्मिक सहिष्णुता निर्माण करणे.
८. आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्व जाणण्यास मदत करणे.
९. सांस्कृतिक विकास व सांस्कृतिक वारशासंबंधी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.

मानवजातीच्या प्रगतीवर सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रवाहांचा असलेला प्रभाव अभ्यासणे

## ५. समारोप

प्रस्तुत संशोधनामध्ये इतिहास म्हणजे काय आणि इतिहास विषयाचे अभ्यासक्रमाशी स्थान याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे त्याचप्रमाणे इतिहास पाठ्यक्रमाची ओळख करून इतिहास विषयाची मुख्य उद्दिष्टे कोणती हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे

## मराठी संदर्भ:

आगलावे, प्रदीप (२००८) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

ओक, सुमन (१९८४) शैक्षणिक तंत्रविज्ञान. पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

कदम, चा. प. व चौधरी, बा. आ. (१९९२) शैक्षणिक मूल्यमापन. पुणे : नूतन प्रकाशन.

करंदीकर, सुरेश (१९९८) मूल्यशिक्षण. कोल्हापूर : फडके प्रकाशन

जगताप, ह. ना. (२०००) प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान. पुणे : नूतन प्रकाशन.

चव्हाण, किशोर, महाले संजिवनी, पाटील सुरेश (२००३) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि शैक्षणिक

बोधनकर, सुधीर व अलोणी, विवेक (२००७) सामाजिक संशोधन पद्धती. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

भोसले, रमा व डोणे, उज्ज्वला (२००९) शिक्षणातील बदलते विचार प्रवाह. कोल्हापूर : फडके प्रकाशन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (२००७) विविध स्तरावरील शिक्षण आणि शिक्षकाची कार्ये बी. एड. साठी पुस्तक. नाशिक.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (१९९८) शिक्षक क्षमता समृद्धी. पुणे : अजय ऑफसेटस्. प्रा.लि.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (२००९) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४